राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई; विशेष मोहीमेमध्ये ३६ गुन्ह्यांसह ५ लाख ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त >> पान 2

नितेश राणेंचे बाप फडणवीस कसे झाले कळलं नाही >> पान 3

आंदोलन मोडण्याचा सरकारने प्रयत्न केल्यास मंत्र्यांना गाव बंदी करू >> पान 4


**सुविचार**
आपल्या कार्यात परिपूर्णता आणा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 271 ■ गुरूवार, दि. 12 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

क्रिती सेननचे ब्यूटी सिक्रेट
आतील पान

## तळकोकण, पुण्यासह राज्यभरात पावसाचे तीव्र अलर्ट

### येत्या ४ दिवसांत जोर वाढणार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी : राज्यात गेल्या चार दिवसात पावसाचा जोर पुन्हा वाढणार असून भारतीय हवामान विभागाने महाराष्ट्रात पावसाचे तीव्र अलर्ट दिले आहेत. आज मराठवाडा, मध्य महाराष्ट्रासह विदर्भ व कोकणपट्टीवर जोरदार पावसाचा इशारा देण्यात आलाय. येत्या चार दिवसांत राज्यभरात पावसाची शक्यता असून तळकोकणासह मध्य महाराष्ट्रातील पुणे साताऱ्यात ऑरेंज अलर्ट देण्यात आले आहेत. राज्यात नैऋत्य मोसमी पावसांनी हजेरी लावल्यानंतर बेफाम पावसाने आधी नागरिकांची धांदल उडाली.**



सकल भागात पाणी साठल्याने प्रवाशांची तारांबळही उडाली. नंतर पावसाने उघडीप घेतली होती. आता राज्यात पावसाचा जोर पुन्हा एकदा वाढणार असल्याचं हवामान विभागानं सांगितलंय. प्रादेशिक हवामान अंदाजानुसार, राज्याच्या अंतर्गत भागात कमाल तापमानात २-३ अंशांची घट होणार असून येत्या तीन ते चार दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात मोसमी पाऊस जोरदार हजेरी लावणार आहे.

आयएमडीच्या अंदाजानुसार, १२ जूनपासून देशभरात मान्सून पुन्हा सक्रीय होणार असून पुढील काही दिवसांत पश्रिचम किनाऱ्यांवर पावसाचा जोर वाढणार आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात मध्यम ते तीव्र स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. पावसाला पोषक वातावरणामुळे राज्यभरात प्रचंड उकाडा वाढलाय. अनेक भागात हलक्या पावसाला सुरुवात झाली आहे. अनेक भागांमध्ये ढगाळ वातावरण आहे.

>> पान २

## पुण्यातही मुंबईप्रमाणे एक सदस्यीय प्रभाग करा, चार सदस्य नकोत

### नव्या प्रभाग रचनेला ठाकरे सेना आणि काँग्रेसचा विरोध

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** मुंबई प्रमाणेच पुण्यातही एक सदस्यीय प्रभागरचना व्हावी. जर चार सदस्यीय प्रभाग रचना आमच्यावर लादली तर आम्ही या निर्णयाविरोधात कोर्टात जाऊ, असा इशारा उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहराध्यक्ष संजय मोरे यांनी दिला. त्यासोबतच पुण्यातील काँग्रेसने देखील या चार सदस्य प्रभाग रचनेला विरोध केला. चार सदस्यीय प्रभाग हे महानगरपालिकेमध्ये योग्य नाही. त्याच्या बदल्यात एक सदस्यीय प्रभाग केला पाहिजे. असं केल्यास नगरसेवकाला नीट काम करता येते. भारतीय जनता पक्षाला फक्त सत्ता भोगायची आहे. नागरिकांच्या समस्यांवर त्यांना काम करायचं नाही. आमचा या निर्णयाला विरोध आहे. भारतीय जनता पार्टी मात्र नेहमीप्रमाणे यावेळीही रडीचा डाव खेळणार असं काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी म्हटलंय.

राज्यातील महापालिका निवडणुकीच्या प्रभाग रचनेचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामध्ये पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, पिंपरी चिंचवड, नवी मुंबई, वसई विरार, छत्रपती संभाजीनगर आणि कल्याण डोंबिवलीसारख्या महापालिकांचा समावेश आहे.

मुंबई महापालिकेमध्ये जुनेच २२७ प्रभाग कायम असून त्या ठिकाणी एक सदस्यीय प्रभाग असणार आहेत. त्याव्यतिरिक्त राज्यातील इतर महापालिकांमध्ये तीन ते चार सदस्यीय प्रभाग असणार आहेत. पुण्यामध्येही >> पान २

## ‘मर्जी’तल्या निवृत्त अधिकाऱ्यांना पुन्हा प्रशासनात घेण्याचा मार्ग खुला

### ६५ वर्षांपर्यंत कंत्राटी पद्धतीने सेवेत घेणार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मंत्रालयासह अनेक शासकीय ठिकाणी कंत्राटी भरतीला प्राधान्य देणाऱ्या राज्य सरकारने आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. आता सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनाही कंत्राटी पद्धतीने पुन्हा सेवेत घेता येणार आहे. वयाच्या ६५ व्या वर्षांपर्यंत या अधिकाऱ्यांना कंत्राटी पद्धतीने काम करता येणार आहे. राज्य शासनाच्या या निर्णयाला कर्मचारी आणि अधिकारी संघटनांनी मात्र विरोध केला आहे. अशा अधिकाऱ्यांची निवड करताना मर्जीतल्या अधिकाऱ्यांनाच संधी दिली जाईल, भेदभाव होण्याची शक्यता असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे.



राज्यातील बहुतांश खात्यातील जागा कायमस्वरुपी न भरता त्या कंत्राटी पद्धतीने भरण्याला राज्य सरकारने प्राधान्य दिलं आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी नव्याने भरतीच झाली नसल्याचं दिसून येतंय. त्यातच आता राज्य सरकारने आणखी निर्णय घेतला आहे. शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या सरकारी अधिकाऱ्यांना पुन्हा >> पान २

## पदाधिकारीच उमेदवारीचा निर्णय घेतील

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** आगामी महापालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकींत्या दृष्टीने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी महत्वाची माहिती दिली आहे. आगामी निवडणुकीत जिल्हाध्यक्ष, महापालिकेचे अध्यक्ष आणि पक्षाचे प्रमुख नेते सांगतील त्यांनाच उमेदवारी देऊ असे मत जयंत पाटील यांनी व्यक्त केले. विधानसभा निवडणुकीत काही आयात उमेदवारांना संधी दिली, त्यातील काही उमेदवार निवडणुका संपल्यानंतर जसे आले तसे निघून गेल्याचे पाटील म्हणाले.

### जयंत पाटलांनी सांगितला आगामी निवडणुकांसाठीचा प्लॅन



आगामी निवडणुकीत पुन्हा हे होणार नसल्याचं जयंत पाटील यांनी म्हटलं आहे. राष्ट्रवादी पक्षाच्या मासिकात पदाधिकारीच उमेदवारीचा निर्णय घेतील असं आश्र्वासन या लेखात जयंत पाटील यांनी दिलं आहे. विधानसभा निवडणुकीत तीन पक्षांच्या चर्चेमुळे काही जिल्ह्यात योग्य उमेदवार देता न आल्याची खंत देखील जयंत पाटील यांनी व्यक्त केली आहे. विधानसभा निवडणुकीत जरी पक्ष फुटलेला असला तरी त्या पक्षाला जागा सोडायची असं ठरलं असल्यामुळं नुकसान झाल्याची जयंत पाटील यांनी या लेखातून कबुली दिली आहे.

राज्य सरकारनं मंगळवारी (ता.१०) महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींना प्रभाग रचना करण्याचे आदेश दिले आहेत. या महापालिका अ, ब आणि क वर्गातील आहेत. सरकारनं प्रभाग रचना तयार करण्याचे आदेश दिलेल्या महापालिकांमध्ये मुंबई, ठाणे, नवी मुंबई, वसई विरार, पुणे, पिंपरी चिंचवड, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नाशिक आणि कल्याण डोंबिवलीसारख्या महापालिकांचा समावेश आहे. सर्वोच्च न्यायालयाने ६ मे २०२५ रोजी झालेल्या सुनावणीवेळी अडीच-तीन वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत घेण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे प्रलंबित या सर्व निवडणुका ऑक्टोबरपर्यंत घेण्याचा आयोगाच्या >> पान २

## आधी आंदोलनात एकत्र, आता चहापानाचे निमित्त, मनसेचे शहराध्यक्ष थेट ठाकरेंच्या शाखेत प्रकटले; डोंबिवलीत मनसे-ठाकरे गटाचे मनोमिलन

**ठाणे/प्रतिनिधी :** राज्यात दोन ठाकरे बंधूच्या युतीची चर्चा असून पुढे गेली नसली तरीही डोंबिवलीत पुन्हा एकदा ठाकरे गट आणि मनसे एकत्र आल्याचं चित्र पाहायला मिळालं. यावेळी निमित्त होते ते एका काम निमित्त चहापानाचे. डोंबिवली पश्चिमेकडील ठाकरे गटाच्या शाखेत मनसेचे शहर अध्यक्ष राहुल कामत गेले आणि त्यांनी ठाकरे गटाचे शहर प्रमुख प्रकाश तेलगोटे यांच्यासह ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांची भेट घेतली. यावेळी ठाकरे गटाचे शहर प्रमुख प्रकाश तेलगोटे यांनी कामत यांचे स्वागत करत त्यांना पुष्पगुच्छ दिला.

या आधी देखील पलावा पुलाच्या आंदोलनात मनसे आणि ठाकरे गट एकत्र दिसला होता. त्या पाठोपाठ आता मनसेचे शहर अध्यक्ष यांनी ठाकरे गटाच्या शहर शाखेला भेट दिली. त्यामुळे डोंबिवलीत पुन्हा एकदा मनसे आणि ठाकरे गट एकत्र आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

## राजकोट किल्ल्यावर भव्य आरमार संग्रहालयासह प्रदर्शन, पर्यटन केंद्र उभारणार

### ➤ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत निर्णय

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** ‘भारतीय नौदलाचे जनक’ छत्रपती शिवाजी महाराज यांचे धैर्य, शौर्य, पराक्रम, अलौकिक कार्याची ओळख नव्या पिढीला व्हावी. छत्रपती शिवाजी महाराज यांनी देशातले पहिले आरमार स्थापन करुन दाखवलेली दूरदृष्टी सर्वांना कळावी. त्यातून प्रेरणा घेऊन भावी पिढी नौदल, नौवहनसेवेत यावी, यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांचा ८३ फुट उंचीचा भव्य पुतळा सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या मालवण तालुक्यातील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आला आहे. आता त्याच परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमाराची यशोगाथा सांगणारे भव्य संग्रहालय, प्रदर्शन आणि पर्यटन केंद्र उभारण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीला, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रिसिंहराजे भोसले, मत्स्यव्यवसाय तथा बंदरे मंत्री नितेश राणे, महसुल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा पाटणकर म्हैसकर, सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, कोकणचे विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी, साताऱ्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील, सिंधुदुर्गचे जिल्हाधिकारी अनिल पाटील, पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे आदींसह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या ८३ फुट उंच पुतळ्यामुळे समुद्रकिनाऱ्यालगत असलेल्या राजकोट किल्ल्याला वेगळं महत्त्व प्राप्त झाले आहे. हा किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या भविष्यात वाढू शकते. या पर्यटकांना छत्रपती शिवाजी महाराज यांनी त्याकाळात स्थापन केलेल्या आरमाराचा इतिहास कळावा, माहिती मिळावी, छत्रपतींच्या आरमारापासून आजच्या आधुनिक नौदलाच्या प्रवासाचे दर्शन घडावे, यासाठी राजकोट किल्ला परिसरात भव्य आरमार-नौदल संग्रहालय उभे राहण्यासह परिसराचा पर्यटनाच्यादृष्टीने विकास करण्याची गरज आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने यासंबंधीच्या प्रस्तावाचा अभ्यास करुन पुढील कार्यवाही करावी, असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बैठकीत दिले. या प्रकल्पासाठीची जागा खासगी व्यक्तीकडून अधिग्रहीत करण्याची कार्यवाही चर्चेतून, सामोपचारांने पूर्ण करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी या प्रकल्पामागची भूमिका विशद करुन सविस्तर माहिती दिली.



## साथ जन्माची गाठ अधुरी! भीषण अपघातात वधू-वरासह ५ जण जागीच ठार

**जयपूर :** राजस्थानच्या जयपूर येथे आज, बुधवारी ट्रक आणि जीपची धडक होऊन भीषण अपघात झाला. यामध्ये ५ जणांचा मृत्यू झाला असून ६ जण जखमी झाले आहेत. दौसा-मनोहरपूर मार्गावर भटकबास गावानजीक सकाळी ६.१५ वाजता झालेल्या या भीषण अपघातात लग्न करून घरी परतणारे वर-वधू देखील मृत्यूमुखी पडलेत.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही वाहनांची समोरासमोर टक्कर झाली. जीपमधील लोक लग्न समारंभाला उपस्थित राहून मध्यप्रदेशहून परतत होते. स्थानिक लोकांकडून अपघाताची माहिती मिळताच पोलिस पथक घटनास्थळी पोहोचले. लोकांच्या मदतीने मृतदेह गाडीतून बाहेर काढण्यात आले.जखमींना निम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यासंदर्भात रायसर पोलिस स्टेशनचे प्रभारी रघुवीर म्हणाले रीस अपघातानंतर महाम ार्गावर जाम झाला आणि गोंधळ उडाला. वऱ्हाडींची जीप मध्यप्रदेशहून मनोहरपूरला जात होती. जखमींचे जबाब घेतले जात आहेत. त्यानंतर कुटुंबातील सदस्यांना माहिती दिली जात आहे. काही गंभीर जखमींना एनआयएमएस रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## रियान परागकडे नेतृत्व, परदेश दौऱ्यात ५ वन डे सामने, आसाम बोर्डाचं मोठं प्लॅनिंग!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** आयपीएलमध्ये चम कदार कामगिरी केलेल्या रियान परागवर आसाम क्रिकेट बोर्डने मोठी जबाबदारी सोपवली आहे. रियान पराग आता आसाम क्रिकेट संघाचे नेतृत्व करणार असून आसाम चा संघ नामिबियाच्या दौऱ्यावर जाणार आहे. आसाम आणि नामिबिया या संघांम ध्ये पाच एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळवण्यात येणार आहे. या मालिकेत अनेक तरुण खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळणार आहे.

भारतीय क्रिकेटपटू रियान परागने इंडियन प्रीमियर लीग सीझन १८ च्या अनेक सामन्यांमध्ये राजस्थान रॉयल्सचे नेतृत्व केले आहे. त्यांचा संघ प्लेऑफम धून बाहेर पडलेला तिसरा संघ होता. आता परागला पुन्हा एकदा नेतृत्वाची संधी मि ळाली आहे. आसाम संघात तरुण आणि अनुभवी खेळाडूंचे मिश्रण आहे. त्यात आकाश सेनगुप्ता, परवेझ मुशर्रफ आणि दानिश दास यांचा समावेश आहे.

## शहादा शहरातील भंगार विक्रेत्याची इमानदारी; लाखोंचा ऐवज केला परत

**नंदुरबार/प्रतिनिधी :**शहादा शहरातील विजयनगर परिसरात एका भंगार विक्रेत्याने इमानदारी दाखवली. दिवसभर फिरून तुटपुंजी कमाई करणाऱ्या भंगार विक्रेत्याला लाखो रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने रद्दीत सापडले. त्यानं स्वत:ची परिस्थिती न पाहता इमानदारी दाखवत ते सोन्याचे दागिने मालकाला परत केले. यामुळे भंगार गोळा करणाऱ्या अमीन शेख यांचं कौतुक होत आहे. दागिने परत मिळताच राजपूत परिवाराला झाले अश्रू अनावर : अमीन शेख शहरामध्ये भंगार गोळा करण्याचं काम करतात. विजयनगर परिसरात भंगार गोळा करत असताना अमीन शेख यांना एका ग्राहकाकडून घेतलेल्या रद्दीत सुमारे दहा लाख किंमत असलेले सोन्याचे दागिने आढळले. लाखो रुपयांचा ऐवज हातात आल्यानंतर एखाद्याचे इमान डगमगलं असतं. मात्र, हातावर पोट असणाऱ्या अम ीन शेख यांनी प्रामाणिकपणा जपत राजपूत परिवाराला लाखोंचा ऐवज सुपूर्द केला. परिवाराला ऐवज परत मिळाल्यानंतर त्यांना आनंदाश्रू अनावर झाले.

## पत्नी पीडित पुरुषांनाही संरक्षण मिळावे!

औरंगाबादेतील वाळूंज भागातील पत्नीपीडित पुरुषांच्या आश्रमात काही पत्नीपीडित पुरुषांनी वटपौर्णिमेच्या आदल्या दिवशी पिंपळपूजन करून पिंपळपौर्णिमा साजरी केली. हे पुरुष दरवर्षी पिंपळपौर्णिमा साजरी करतात. आमच्या बायकांनी आम्हाला इतका त्रास दिला आहे की आम्ही त्यांच्यासोबत सात जन्मच काय सात सेकंदही संसार करू शकत नाही म्हणूनच आम्हाला अशा प्रकारच्या बायका देण्यापेक्षा कायमस्वरूपी मुंजा ठेव अशी प्रार्थना ते यम आणि मुंजाला करतात. हा प्रकार काहीसा विचित्र वाटत असला तरी खरा आहे. पुरुषही कौटुंबिक हिंसाचाराचे बळी ठरतात यावर अजूनही अनेकांचा विश्वास बसत नाही याला कारण आहे आपली पुरुष प्रधान संस्कृती. पुरुषच महिलांवर अत्याचार करतो, त्यांचा मानसिक छळ करतो हेच आजवर आपण पाहत आलो आहोत पण आता काळ बदलला आहे. पुरुषही महिलांच्या अत्याचाराला बळी पडत आहे. आज कितीतरी पुरुष महिलांचा मानसिक अत्याचार सहन करत आहेत. पत्नी आपल्यावर अत्याचार करते आपला मानसिक छळ करते हे जर समाजात माहीत झाले तर आपलीच नाचक्की होईल या भीतीने अनेक पुरुष तो अत्याचार मुकाट्याने सहन करतात. ज्यांना हा अत्याचार सहन होत नाही ते आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात. काही महिन्यांपूर्वी बंगळुरू मध्ये एका कंपनीत अभियंता असलेल्या ३४ वर्षीय अतुल सुभाष या तरुणाने पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी या तरुणाने आपल्यावरील आपबिती ९० मिनिटांचा व्हिडिओ काढून तसेच ४० पाणी सुसाईड नोट लिहून सांगितली. या तरुणाला त्याच्या पत्नी आणि सासरच्यांनी हुंडाबळीच्या चुकीच्या आरोपाखाली तरुंगामध्ये पाठवले होते. काहीही चूक नसताना या तरुणाला तुरुंगात जावे लागले. न्यायालयात तो स्वतःचं निर्दोषत्व सिद्ध करू शकला नाही. समाजात त्याची बदनामी झाली त्यामुळे आलेल्या नैराश्यातून त्याने आत्महत्या केली. अर्थात अशी आत्महत्या करणारा अतुल सुभाष हा पहिला तरुण नाही याआधीही अनेक तरुणांनी पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्या आहेत. आताही काही दिवसांपूर्वी पुणे जिल्ह्यातील उरुळी येथे एका तरुणाने याच कारणाने आत्महत्या केल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचनात आली. महिलेचा पती व त्याच्या कुटुंबियांकडून होणारा छळ रोखण्यासाठी ४९८ ( अ ) हा कायदा करण्यात आला. महिलांना संरक्षण देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या या कायद्याचा अलीकडे मोठ्या प्रमाणात दुरुपयोग होऊ लागला आहे. या माध्यमातून पती आणि सासरच्या लोकांविरुद्ध वैयक्तिक सुड उगवला जात आहे. महिलांनी त्यांच्या संरक्षणासाठी केलेल्या कायद्याचा अशाप्रकारे दुरुपयोग करू नये अशी टिप्पणी माननीय सर्वोच्च न्यायालयाने देखील केली आहे. तरीही या कायद्याचा दुरुपयोग कमी होत नाही. पत्नीने पती विरुद्ध तक्रार दिली तर त्याची तातडीने दखल घेतली जाते. पत्नीवर अन्याय करणाऱ्या पतीला तात्काळ अटक केली जाते पण पतीला पत्नी विरुद्ध कारवाई करायची असेल, तर आपल्या देशात कौटुंबिक हिंसाचार अधिनियमना सारखा कायदा उपलब्ध नाही. सध्या असलेला कौटुंबिक अधिनियम संरक्षण कायदा पुरुषांना संरक्षण देत नाही. महिलांप्रमाणेच पत्नी पीडित पुरुषांनाही संरक्षणाचा अधिकार मिळावा यासाठी सरकारने कौटुंबिक हिंसाचार अधिनियम कायद्यात दुरुस्ती करून पत्नी पीडित पुरुषांना संरक्षण द्यावे.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई; विशेष मोहीमेमध्ये ३६ गुन्हयांसह ५ लाख ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत दि. १० व ११ जुन २०२५ रोजी संपुर्ण जिल्हयात विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहीमेमध्ये एकुण ३६ गुन्हयांची नोंद करण्यात आलेली असुन ३६ आरोपींसह हातभट्टी ३७१ लि. रसायन ८३५७ लि. देशी मद्य ११७.७२ लि. व विदेशी मद्य ३५.८२ लि. यासह एकुण ५ लक्ष ९८ हजार ७०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले.

आयुक्त,रा.ऊ.शु.म.रा.मुंबई डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, अधीक्षक, रा.ऊ. शु. बुलढाणा डॉ. पराग नवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हात दि. १० व ११ जुन २०२५ रोजी विशेष मोहीम राबविण्यात आली. मोहिमेमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक





ईश्वर नारायण वाघ निरीक्षक,राज्य उत्पादन शुल्क, बुलढाणा यांच्या नेतृत्वाखाली बुलढाणा शहरातील भीलवाडा,आंबेडकर नगर, कैकाळीपुरा या भागात अवैध हातभट्टीवर १२ वारस गुन्हे नोंदवुन १३३ लि हातभटटी व ३११४ लि रसायनासह एकुण १ लक्ष ६० हजार १७५ हजार रुपयांचा मुद्येमाल पकडण्यात आला. बोज्जावार निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भ.प. बुलढाणा यांनी भादोला, डोंगरखंडाळा या भागात अवैध मद्य विक्री ७ वारस गुन्हे नोंदवुन १३१ लि हातभट्टी व – ३३९२ लि रसायन व ४.३२ लि देशी व सह एकुण १ लक्ष ५६ हजार २८० रुपयांचा मुद्येमाल पकडण्यात आला. व्ही एम. पाटील निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, खामगाव यांनी मनसगाव,शेगाव, देवधाबा मलकापुर या भागात अवैध हातभट्टी व मद्यविक्री ८ वारस गुन्हे नोंदवुन १०७ लि हातभटटी व १८५१ लि रसायन व ११.९७ लि देशी व सह एकुण १ लक्ष ५६ हजार ८० रुपयांचा मुद्येमाल पकडण्यात आला. रोकडे निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, चिखली व रोटे दु. नि. दे. राजा – १ व नयना देशमुख दु नि दे.राजा–२ व भगत यांनी चिखली, देउळगावराजा भागामध्ये अवैध मद्य विक्री ९ वारस गुन्हे नोंदवुन ६८.४० लि देशी व २५.९२ लि. विदेशी सह एकुण १ लक्ष २६ हजार १७० रुपयांचा मुद्देमाल पकडण्यात आला.

पुढील काळात राज्य उत्पादन शुल्क विभागाकडुन अवैध हातभट्टी केंद्रावर अशाच प्रकारे विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. त्यामुळे आपल्या परीसरात अवैध मद्य विक्री अथवा बनावट निर्मीती आढळल्यास या विभागास टोल फ्री नंबर १८००२३३९९९९ वर किंवा व्हॉटसअॅप नंबर ८४२२००११३३ वर किंवा excisesuvidha.mahaonline.gov.in या विभागाचे पोर्टलवर तात्काळ कळवावे. तसेच बुलढाणा जिल्हयातील किरकोळ व ठोक विक्री मद्य अनुज्ञप्तीधारक यांच्या अनुज्ञप्तीमध्ये जर बनावट मद्य आढळुन आले तर त्यांची अनुज्ञप्ती कायमस्वरुपी रद्द करण्यात येईल. मद्य बाळगतांना, मद्य सेवन, मद्य वाहतुक करतांना किंवा आपले जागेचा वापर अवैध धाबा चालवीण्यासाठी दिल्यास त्यावर महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ अंतर्गत कठोर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी,असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

## आयटीआयच्या विद्यार्थ्यांना स्थानिक उद्योगातच अँप्रेन्टीसशिप मिळणार : मंत्री मंगलप्रभात लोढा

**मुंबई/प्रतिनिधी :** आयटीआयच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या राहत्या जिल्ह्यातच स्थानिक उद्योगात शिकाऊ उमेदवारी अर्थात अँप्रेन्टीसशिप द्यावी, असे आदेश कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिले आहेत. या निर्णयामुळे प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना आता त्यांच्या जिल्ह्यातल्या उद्योगात विद्यावेतनासह काम करण्याची संधी मिळणार आहे.



केंद्र शासनाच्या नियंत्रणाखाली औद्योगिक आस्थापनांमध्ये उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधांचा विनियोग करून कुशल कारागिरास आवश्यक असलेले प्रशिक्षण देण्यासाठी, राज्यात 'महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना' राबवण्यात येत आहे. मंत्री श्री. लोढा यांच्या नेतृत्वात प्रतिवर्षी तब्बल एक लाख उमेदवारांना प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यानुसार ३० व त्यापेक्षा जास्त मनुष्यबळ (कंत्राटी कर्मचाऱ्यांसह) असलेल्या आस्थापनांमध्ये एकूण मनुष्यबळाच्या किमान २.५ टक्के ते कमाल २५ टक्के शिकाऊ उमेदवारीच्या जागा स्थित करणे बंधनकारक आहे. सदर योजना २७ गटातील २५८ निर्देशित (Designated), ३५ क्षेत्रातील ४१४ वैकल्पिक (Optional) तंत्रज्ञ (व्यवसायिक) अंतर्गत सहा गटातील २० आणि महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास परीक्षा मंडळाच्या १२३ व्यवसायांना शिकाऊ उमेदवारी लागू करण्यात आली आहे. शिकाऊ उमेदवारीचा कालावधी व्यवसायनिहाय सहा ते ३६ महिने आहे. शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षित (trained) तसेच अप्रशिक्षित (Fresher) उमेदवारांना प्रशिक्षण दिले जात आहे.

शासकीय, निमशासकीय आणि खासगी आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवारांची भरती वाढवून प्रोत्साहित करण्यासाठी 'महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना' राज्यात मोठ्या प्रमाणावर राबवली जात आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या सुधारित अभ्यासक्रमांचाही वेळोवेळी आढावा घेऊन त्या ट्रेड्स या योजनेत समाविष्ट केल्या जातील. राज्य आणि केंद्र शासनाच्या नियमानुसार मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांना आवश्यक ती प्रतिपूर्ती केली जाणार आहे. दरम्यान राहत्या जिल्ह्यातच स्थानिक उद्योगात शिकाऊ उमेदवारी अर्थात अँप्रेन्टीसशिप मिळत असल्याने आयटीआयच्या हजारो विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या २०० विद्यार्थ्यांना अप्रेंटिसशिपसाठी नियुक्ती दिली जात होती. मात्र गेल्या काही वर्षांपासून या नियुक्त्या दिल्या जात नव्हत्या. आता महानगरपालिकेत पूर्वीप्रमाणे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळामधील विद्यार्थ्यांना अप्रेंटिसशिपसाठी नियुक्ती देण्याबाबत मंत्री श्री. लोढा प्रयत्नशील असून यासंदर्भात त्यांनी मुंबई महापालिका आयुक्तांना पत्रही दिले आहे. लवकरच मुंबई महापालिकेसोबत इतर महापालिकांमध्येही विद्यार्थ्यांना अँप्रेन्टीसशिपची संधी मिळणार आहे.

## क्रिती सेननचे ब्यूटी सिक्रेट

**मुंबई/प्रतिनिधी :** आपलं सौंदर्य वाढवायला कोणाला आवडत नाही. अनेकजण घरगुती उपायांसह अभिनेत्री काय स्किन केअर करतात हे देखील फॉलो करतात. अनेक अभिनेत्री त्यांचे ब्यूटी सिक्रेट किंवा स्किन केअर रुटीन आपल्या चाहत्यांसाठी त्यांच्या सोशल मीडियावर शेअर करत असतात. त्यातीलच एक म्हणजे अभिनेत्री क्रिती सेनन. क्रिती अनेकदा तिचं स्किन केअर रुटीन शेअर करत असते. तिने त्वचा चमकदार आणि हायड्रेट राहण्यासाठी काय करायचं हे सांगितंलं आहे.

क्रिती सेननचं ब्यूटी सिक्रेट क्रिती सेनन सकाळी उठल्यानंतर पहिलं काम करते ते म्हणजे त्वचेची काळजी घेणे. झोपेतून उठल्यानंतर, क्रिती सामान्य पाण्याने चेहरा धुते आणि सकाळी उठताच त्वचेला चमकदार बनवण्यासाठी क्रिती अनेक टीप्स फॉलो करते.

त्वचेच्या हायड्रेशनसाठी भरपूर पाणी प्या सकाळी उठल्यानंतर क्रिती एक पेय पिते. ज्यामुळे त्वचा हायड्रेट राहते. क्रिती कोमट पाण्यात लिंबू मिसळून पिते. यामुळे त्वचेला हायड्रेशन मिळते आणि त्वचा चमकदार होते.

सौम्य क्लींजरने चेहरा स्वच्छ करणे त्यानंतर क्रिती तिचा चेहरा स्वच्छ करण्यासाठी सौम्य क्लींजर वापरते. यामुळे त्वचेत लपलेली घाण निघून जाते आणि त्वचा चमकू लागते. पिण्याच्या पाण्यासोबतच, क्रिती तिच्या त्वचेवर वाटर स्प्रे करते त्वचेला अतिरिक्त हायड्रेशन मिळेल.

जेल आधारित सीरमचा वापर त्वचेच्या काळजीसाठी, क्रिती जेल आधारित सीरम वापरते. ज्यामध्ये हायलुरोनिक ॲसिड असते, ज्यामुळे त्वचा मऊ होते.

सनस्क्रीनचा वापर क्रिती कधीही सनस्क्रीन लावायला विसरत नाही.लाइटवेट वॉटर बेस सनस्क्रीन ती वापरते. त्यामुळे त्वचेचे सूर्याच्या हानिकारक अतिनील किरणांपासून संरक्षण होते.

पान १ वरून...

## तळकोकण, पुण्यासह राज्यभरात

कोणत्या जिल्ह्याला कोणता अलर्ट?

आजपासून राज्यभरात पावसाची हजेरी लागणार असून हवामान विभागाने दक्षिण महाराष्ट्रासह तळ कोकणात तीव्र पावसाचे अलर्ट दिले आहेत.

११ जून– मध्य महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाड्यात आज पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. ठाणे, पालघर, धुळे, जळगाव, नंदुरबार, बुलढाणा व कोकणात सिंधुदूर्ग वगळता इतर सर्व जिल्ह्यांना आज पावसाचा यलो अलर्ट आहे.

१२ जून– सांगली,कोल्हापूर, सिंधुदूर्ग जिल्हयाला ऑरेंज अलर्ट, पालघर व नंदूरबार वगळता उर्वरित भागात पावसाचा यलो अलर्ट

१३ जून– रत्नागिरी, सिंधुदूर्ग, सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्हयांना पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून नाशिक, धुळे, नंदूरबार व पालघर वगळता उर्वरित जिल्ह्यांना पावसचा यलो अलर्ट देण्यात आलाय.

१४ जून– रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा जिल्ह्यांमध्ये पावसाचा ऑरेंज अलर्ट व मध्य महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाड्यातील काही भागांना यलो अलर्ट देण्यात आलाय.

### पुण्यातही मुंबईप्रमाणे

बहुसदस्यीय प्रभाग असणार आहेत. पुण्यामध्ये १६२ नगरसेवक असणार आहेत. त्या हिशोबाने प्रभाग रचना करण्यात येणार आहे.

अ वर्ग महानगरपालिका – पुणे, नागपूर

ब वर्ग महानगरपालिका – ठाणे, नाशिक, पिंपरी–चिंचवड

क वर्ग महानगरपालिका – नवी मुंबई, वसई–विरार, छत्रपती संभाजीनगर, कल्याण डोंबिवली

ड वर्ग महापालिकांमध्ये तीन ते पाच सदस्य

ड वर्गातील महापालिकेत प्रभाग रचना ठरवताना शक्यतोवर सर्वच प्रभाग चार सदस्यांचे करायचे आहेत. मात्र, सर्वच प्रभाग चार सदस्यांचे होत नसल्यास एक प्रभाग तीन अथवा ५ सदस्यांचा होईल किंवा दोन प्रभाग ३ सदस्यांचे होतील. ड वर्ग महापालिकांमध्ये अमरावती, अहिल्यानगर, अकोला, कोल्हापूर, सोलापूर, संगाली–मिरज–कुपवाड, मिरा भाईंदर, उल्हासनगर, भिवंडी–निजामपूर, जळगाव, नांदेड, धुळे, मालेगाव, लातूर, चंद्रपूर, परभणी, पनवेल, इचलकरंजी आणि जालना या महापालिकेचा समावेश आहे.

गेल्या काही वर्षांपासून पुणे महापालिकेमध्ये प्रशासक असल्याने प्राथमिक प्रश्न्न मार्गीच लागले नसल्याचं दिसून आलं. दाद मागायला नगरसेवक नाही आणि अधिकाऱ्यांकडे जाण्याची सामान्य नागरिकांची पोहोच नाही. त्यामुळे पुण्यातल्या अनेक परिसरातले प्रश्र्न आहे तसेच आहेत. प्रश्र्न आहे, मात्र वाली नाही असं काहीसं चित्र आहे. त्यामुळे दाद नेमकी कोणाकडे मागावी असा प्रश्र्न प्रत्येक पुणेकराला पडला आहे. सोबतच हा सगळा कारभार फक्त ठेकेदारांना हवा तसा चाललाय असे स्पष्ट मत पुणेकरांनी व्यक्त केलं.

### 'मर्जी'तल्या निवृत्त

कंत्राटी पद्धतीने सेवेत घ्यायचा मार्ग मोकळा झाला आहे.

वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंत अशा अधिकाऱ्यांना कंत्राटी भरतीच्या माध्यमातून सेवेत घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यामध्ये सर्व शासकीय आणि निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना करार पद्धतीने सेवेत घेता येणार आहे. सध्या राज्यात शासकीय निवृत्तीचे वय ५८ वर्षे आहे. त्यामुळे करार पद्धतीने अशा अधिकाऱ्यांना आणखी सात वर्षे सेवेत राहता येणार आहे. मात्र राज्य सरकारच्या या निर्णयाला कर्मचारी, अधिकारी संघटनांचा विरोध आहे. जर राज्य सरकार ६५ वर्षापर्यंत करार पद्धतीने कामावरती घेत असेल तर निवृत्तीचं वय ६० वर्षे का करत नाही असा प्रश्र्न त्यांनी विचारला आहे.

कंत्राटी पद्धतीने निवृत्त अधिकाऱ्यांना सेवेत घेताना भेदभाव करून त्यांची निवड केली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे करार पद्धतीने घेण्याऐवजी निवृत्तीचे वय ६० वर्षे करावे अशी मागणी कर्मचारी आणि अधिकारी संघटनांनी केली आहे. राज्यात सध्या शासकीय कर्मचाऱ्याच्या निवृत्तीचे वय ५८ वर्षे इतके आहे. ते वाढवून ६० वर्षे करण्यात यावे अशी मागणी सातत्याने केली जात आहे. या आधी निवृत्तीचे वय हे ६० वर्षेच होतं. पण नंतर ते कमी करून ५८ इतके करण्यात आलं. आता निवृत्तीचे वय पुन्हा ६० वर्षे करावे अशी मागणी कर्मचारी आणि अधिकारी संघटनांनी केली आहे.

### पदाधिकारीच उमेदवारीचा

उद्देशानं आता सरकारनं पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

काही दिवसांपूर्वीच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम तीन टप्प्यात घेण्याचे विचाराधीन असल्याची माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली होती. याचवेळी त्यांनी स्थानिकच्या निवडणुका येत्या सप्टेंबर –ऑक्टोबर महिन्यात घेतल्या जातील, असेही म्हटलं होतं. त्यामुळं आता पुढच्या चार महिन्यांमध्ये निवडणुकांची रणधुमाळी सुरु होणार आहे. त्या दृष्टीने सध्या सर्वच राजकीय पक्ष तयारीला लागल्याचे चित्र दिसत आहे. सभा, दौरे, चर्चा सुरु असल्याचं पाहायला मिळत आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# नितेश राणेंचे बाप फडणवीस कसे झाले कळलं नाही

## विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची बोचरी टीका

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** नितेश राणे यांचे वडील नारायण राणे असताना, फडणवीस कुठून बाप लागले कळलं नाही.अशी बोचरी टीका विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी माध्यमांशी बोलताना केली. माध्यमांशी बोलताना म्हणाले की, मराठवाडा ट्रॅक्टर आणि बैलगाडी मोर्चा आहे. विधानसभा निवडणुकीत अनेक वादे करण्यात आले होते. त्याची आठवण करून देत आहे. महानगरपालिका प्रभाग सगळे जसेच्या तशीच राहील. ज्या महानगरपालिका भौगलीक दिशा बदलल्या त्यांच्या प्रभाग बदलेल, यात काही घोळ नाही. उद्धव ठाकरे यांचे सरकार असताना, अजित पवार निधी देत नसल्याचे हे लोक बोंबलत होते, आता त्याच लोकांसोबत मांडीला मांडी लावून बसतात. छगन भुजबळ राष्ट्रवादीच्या नव्हे, तर भाजपच्या कोट्यातून मंत्री झाले की काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. बडगुजर कुठे जातात माहीत नाही, ईडीमुळे जेलमध्ये गेलेले अनेक लोकांना भाजपने घेतल आहे.आता त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे.वाघ्या कुत्रा वादावर इतिहास संशोधकांनी निर्णय घेतला पाहिजे, जे काही त्या सत्य असेल, त्यानुसार इतिहास



सांगून इतिहासकारांचे मत घेतले पाहिजे. अधिकाऱ्यांनी कुठे राहायचे अभिप्राय घेतल्यावर देखील संजय राठोड यांच्या मर्जीनुसार बदल्या झाल्या आहेत. सगळ्याच खात्यात कंत्राटद्वार काम सुचवत असतात, १५ लाखाची वस्तू कोटी रुपयात घेतात, मेघा इंजिनीअरला कोट्यवधी काम दिले जातात. मंत्री शिरसाट जमीन प्रकरणी मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे, शिरसाट यांना फ्लॅट देण्यात आला. यात आर्थिक मुद्दा आहे, २५ लाख उत्पन्न असताना ६ कोटी कर्ज कसे देतात. हे पैसे निवडणूक पत्रात दाखवले नाही. आरक्षण काढून जमिनी घेतल्या,एक प्रकार आणि आर्थिक ही दुसरी गोष्ट आहे. बच्चू कडू उपोषणावर बोलताना म्हणाले की, बच्चू कडू सत्तेत असताना, त्यांनी या मागणीसाठी प्रयत्न केले होते का? असा प्रश्न उपस्थित केला.

मराठा आरक्षणाबाबत दोन्ही बाजूने याचिका आहेत.उद्धव ठाकरे असताना कायदेशीर बाजू मांडत नसल्याचे म्हणायचे, आता हे कशी कायदेशीर बाजू मांडतात पाहू असे मत विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी व्यक्त केले.

## संक्षिप्त...


### शरद पवारांनी बच्चू कडूंना प्रकृती जपण्याचा दिला सल्ला



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाचा तिसऱ्या दिवशी जिल्हाधिकाऱ्यांची बैठक संपताच बच्चू कडू यांना माजी केंद्रीय मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी फोन करून वडिलकीचा सल्ला म्हणून प्रकृती जपण्याचा सल्ला दिला आहे. नितेश कराळे मास्तरांनी बच्चू कडू आणि शरद पवार यांचे फोनवर बोलणे करून दिले.यावेळी शरद पवारांनी बच्चू कडूंना प्रकृती जपण्याचा दिला वडीलकीचा सल्ला दिला.बच्चू कडू यांच्या आंदोलनात कराळे मास्तरांची मध्यस्थी केली.

### अलिबाग जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शासकीय कर्मचारी महिलेचे आमरण उपोषण



दैनिक आपला विदर्भ

**रायगड/प्रतिनिधी :** रायगडच्या मुरुड मधील एका शासकीय कर्मचारी महिलेने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दोन दिवसांपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. गैरशिस्तींचे काम केल्यामुळे या महिलेला मुरूड मधील गटविकास अधिकारी जिल्हा अभियान करत असल्याचा आरोप माझ्यावर करून आपल्या कामांबाबत गैर शिस्तीच्या आरोपाबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती मुरूड, जिल्हा सह संचालक यांनी काढून टाकल्याचा आरोप या महिलेने केला आहे. माझी कोणतीही चौकशी न करता माझ्यावर आरोप या अधिकाऱ्यांनी केले आहेत. मी कोणत्या प्रकारचे गैरशिस्तीचे काम केले आहे याचे मला पत्र मिळणे गरजेचे होते. मात्र, तसं न करता माझ्यावर तडकाफडकी कारवाई करण्यात आली. यासाठी महिलेने कालपासून जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग मध्ये आमरण उपोषण सुरू केले आहे.

### छत्रपती संभाजीनगर शहरातील महानगरपालिकेच्या सिद्धार्थ उद्यानामध्ये भिंत कोसळून दोन महिलांचा मृत्यू



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर शहरातील महानगरपालिकेच्या सिद्धार्थ उद्यानामध्ये भिंत कोसळून दोन महिलांचा मृत्यू झाला आहे. प्राथमिक माहितीनुसार या दोन्ही महिला उद्यानात कर्मचारी होत्या. तर इतर ५ जण गंभीर जखमी आहेत. प्राथमिक माहितीनुसार (स्वाती खैरनाथ वय ३५, हल्ली मुक्काम रांजणगाव मुळगाव लासलगाव), (रेखा गायकवाड वय ३८, सौभाग्य चौक एन ११ हडको) असं मयत झालेल्या महिलांचीनावेआहेत. या उद्यानात वाघासह इतर प्राणी आणि मुलांना खेळण्यासाठी जागा असल्याने नेहमी वर्दळ असते. काहीच वर्षांपूर्वी बांधलेल्या प्रवेशद्वाराच्या बांधकामाबद्दल प्रश्न उपस्थितकेलाजातो आहे.

### दिवा विझताना मोठा होतो, तसं जयंत पाटलांचं झालंय; गोपीचंद पडळकरांची जहरी टीका

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्धापन दिन सोहळ्यात प्रदेशाध्यक्षपदाच्या जबाबदारीतून मला मुक्त करा, अशी मागणी करणाऱ्या जयंत पाटील यांच्यावर भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी तिखट शब्दांत टीका केली आहे. जयंत पाटील यांचे राजकारण संपत आले आहे. दिवा विझताना मोठा होता. तशी सध्या जयंत पाटील यांची अवस्था झाली आहे, असे वक्तव्य गोपीचंद पडळकर यांनी केले. ते बुधवारी कोल्हापूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी गोपीचंद पडळकर यांनी जयंत पाटील यांच्यावर अत्यंत जहरी टीका केली.

# पेट्रोलियम पाईपला छिद्र पाडून इंधन चोरी ५ जण पोलिसांच्या ताब्यात

## ग्रामीणचे पोलीस अधीक्षक पाटील यांची महिती



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** पेट्रोलियम पाईपला छिद्र पाडून इंधन चोरी करणाऱ्या पाच जणांना पोलिसांनी अटक केली आहे. अशी माहिती नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, जिल्ह्यातील मुंबई मनमाड उच्च दाब भूमिगत पेट्रोलियम पाईपला छिद्र पाडून इंधन चोरी करण्यात येत असल्याचे धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. वेळीच पोलिसांनी मोठी घटना होण्याआधीच या घटनेचा तपास करत ५ जणांना घेतले ताब्यात घेतले आहे. या टोळीकडून पाईपलाईन ला छिद्र पाडून इंधन व्यवसाय करण्याचा प्रयत्न असल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे.इंधन पाईपलाईन उच्च दाबाचा असल्याने या चोरी दरम्यान मोठी घटना देखील घडू शकली असती, पेट्रोल चोरीचा उद्देश होता का अजून काही कारण या मागे होत. या सर्व अनुषंगाने पोलिसांकडून तपास करीत आहेत. मागच्या महिन्यात मनमाड परिसरात असलेल्या इंधन प्लांट पासून तीन किलोमीटर अंतरावर पेट्रोल पाईपलाईनला छिद्र पाडून पेट्रोल काढयात येत होते.मनमाड परिसरात इंधनाचे मोठे प्लांट याच परिसरातुन होतो. पेट्रोलियम पाईपला छिद्र पाडून इंधन चोरी करणाऱ्या पाच जणांना पोलिसांनी अटक केली. त्यांची कसून चौकशी केली जात असून सर्वांगीण दृष्टीने तपास करण्याला प्राधान्य दिले जात आहे.अशी माहिती नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

# आषाढी वारीत दर्शन रांगेतील घुसखोरी बंद होणार, दर्शन रांगेला लावल्या ६ फुटांच्या जाळ्या

**मुंबई/प्रतिनिधी :** आषाढी वारीचा सोहळा जवळ आला आहे. या वारीसाठी राज्यभरासह देशातील इतर राज्यातून मोठ्या संख्येनं भाविक पंढरपुरात श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी येत असतात. या काळात पंढरपुरात मोठी गर्दी होत असते. या वारीच्या काळात विठ्ठलाच्या दर्शनाची रांग मंदिरापासून सात ते आठ किलोमीटर लांब जात असते. अशावेळी भाविक ३०-३० तास दर्शन रांगेत उभे राहत असतात. पण दर्शन रांगेत जास्त वेळ उभे राहावे लागू नये म्हणून अनेक भाविक ठिकठिकाणी दर्शन रांगेत घुसखोरी करत असतात. पण आता अशा भाविकांना दर्शन रांगेत घुसखोरी करता येणार नाही. कारण दर्शन रांगेला आतासहा फुटांच्या जाळ्या लावल्या आहेत.

या आषाढी वारीत वृद्ध लहान मुले महिला यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. दर्शन रांगेत जास्त वेळ उभे राहावे लागू नये यासाठी अनेक भाविक ठिकठिकाणी दर्शन रांगेत घुसखोरी करीत असतात. याचा नाहक त्रास वृद्ध भाविकांनी महिलांना सोसावा लागत असतो. आता अशा घुसखोर भाविकांना पायबंध घालण्यासाठी मंदिर समितीने दर्शन रांग ही ६ फूट जाळ्या लावून बंद करण्याचे काम सुरु केल्याने आता अशा भाविकांना रांगेत घुसता येणार नाही.

दरम्यान, यावर्षी आषाढी वारीच्या कालावधीत होणाऱ्या गर्दीचे नियंत्रण आणि व्यवस्थापनासाठी या एआय तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. चैत्री एकादशी दिवशी याची चाचणी देखील पंढरपूर येथील बसस्थानक येथून घेण्यात आली होती. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, प्रशिक्षित आय.पी.एस अधिकारी अंजना कृष्णन, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, विक्रांत गायकवाड, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, ड्रोन आयडीया फोर्चचे एजीएम आशिष माथूर उपस्थित होते. श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी वर्षाकाठी पंढरपुरात जवळपास दोन ते अडीच कोटी भाविक येत असतात. आषाढी यात्राकाळात मानांच्या पालख्यांसह अनेक दिंड्या पायी पंढरपूरला येत असतात. यात्रा काळात भाविकांना सुरक्षित आणि सुलभ दर्शन मिळावे, कुठेही अनुचित प्रकार घडू नये. यासाठी प्रशासनाकडून एक महिना अगोदरच तयारी केली जाते.

# पेटीएमची वैयक्तिकृत युपीआय आयडी सुविधा

## पेमेंट प्रायव्हसी सुधारण्यासह मोबाईल नंबर एक्सपोज होण्यापासून रोखणार

**मुंबई/प्रतिनिधी :** पेटीएमने वैयक्तिकृत युपीआय आयडी सुविधा सादर केली आहे, जी प्रायव्हसी वाढवते आणि मोबाइल पेमेंट करण्याचा अधिक लवचिक मार्ग देते. हा पुढाकार कंपनीच्या रोजच्या डिजिटल पेमेंट्सला सुलभ आणि सुरक्षित बनवण्याच्या बांधिलकीचे प्रतिबिंब आहे. ही नवीन सेवा वापरकर्त्यांना नावपीटीयेस किंवा नावपीटीएक्सिस यांसारखी वैयक्तिकृत युपीआय आयडी निवडण्याची अनुमती देते, ज्यामुळे व्यक्ती आपला मोबाईल नंबर उघड न करता पैसे पाठवू आणि प्राप्त करू शकतात. ही सेवा सध्या येस बँक आणि एक्सिस बँक यांनी जारी केलेल्या हँडल्सवर उपलब्ध आहे आणि लवकरच इतर बँकिंग भागीदारांपर्यंत विस्तारित केली जाईल.

तुम्ही एखाद्या दुकानदाराला पैसे देत असाल, डिलिव्हरी एक्झिक्युटिव्हसोबत हिशेब करत असाल, किंवा नवीन विक्रेत्याकडे पैसे ट्रान्सफर करत असाल, तरीसुद्धा पेटीएम हे भारतातील सर्वात विश्वासार्ह आणि सुरक्षित पेमेंटचे साधन राहते. वैयक्तिकृत युपीआय आयडी सह पेटीएम आता अधिक प्रायव्हसी प्रदान करते. जेव्हा वापरकर्ता त्याच्या वैयक्तिकृत युपीआय आयडीचा वापर करून पैसे पाठवतो किंवा प्राप्त करतो, तेव्हा त्याचा मोबाईल नंबर व्यवहाराच्या तपशीलात दिसत नाही. हे वैयक्तिक माहितीचे संरक्षण करते आणि व्यक्तींना एक अद्वितीय आणि सहज ओळखता येणारी पेमेंट ओळख निर्माण करण्याची अनुमती देते. हे एक अखंड अनुभव आहे, जो विश्वास, सुरक्षा आणि दररोजच्या सोयीसाठी तयार केला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर, पेटीएम आता युएई, सिंगापूर, फ्रान्स, मॉरिशस, भूतान, श्रीलंका आणि नेपाळमध्ये युपीआय पेमेंट्स सक्षम करतो, ज्यामुळे जागतिक भारतीय प्रवाश्यांसाठी अधिक सोयी मिळते.

पेटीएम प्रवक्त्याने सांगितले, आम्ही पेमेंटमध्ये अधिक पर्याय आणि प्रायव्हसी प्रदान करण्यासाठी वैयक्तिकृत युपीआय आयडी सादर केली आहे. आमच्या ग्राहकांकडून आम्हाला असा फीडबॅक मिळाला की त्यांना त्यांचा मोबाईल नंबर खाजगी ठेवायचा आहे, आणि ही गरज पूर्ण करण्यासाठी आम्ही हे समाधान तयार केले. आम्ही अशा विचारपूर्वक नवकल्पनांच्या विकासासाठी कटिबद्ध आहोत ज्या सर्वांसाठी पेमेंट्स अधिक सुरक्षित आणि सोयीस्कर बनवतील.

पेटीएम ॲपमध्ये वैयक्तिकृत युपीआय आयडी तयार करण्यासाठी:

पेटीएम ॲप उघडा

प्रोफाइल चिन्हावर टॅप करा आणि 'युपीआय सेटिंग्ज' मध्ये जा

'मॅनेज युपीआय आयडी' निवडा आणि वैयक्तिकृत आयडी निवडा

नवीन युपीआय आयडी पेमेंटसाठी वापरण्यासाठी प्राथमिक युपीआय आयडी म्हणून कन्फर्म करा आणि ॲक्टिवेट करा

पेटीएमने मोबाइल पेमेंट्स अधिक सुरक्षित, स्मार्ट आणि विश्वासार्ह बनवण्यासाठी आणखी सात प्रमुख नवकल्पना सादर केल्या आहेत:

१. प्रायव्हसी वाढवण्यासाठी पेमेंट लपवण्याची किंवा उघड करण्याची क्षमता

२. खर्चाचे स्वयंचलित वर्गीकरण आणि मासिक खर्च सारांश

३. मोबाइल होम स्क्रीनवर येणाऱ्या पेमेंट्ससाठी 'रिसिव्ह मनी' विजेट

४. जलद पेमेंटसाठी होम स्क्रीनवर 'स्कॅन अँड पे' विजेट

५. ५००० रुपयापर्यंतच्या लो-वॅल्यू पेमेंटसाठी पेटीएम युपीआय लाइटसाठी ऑटो टॉप-अप

६. चांगल्या आर्थिक ट्रॅकिंगसाठी युपीआय स्टेटमेंट पीडीएफ आणि एक्सेल फॉरमॅटमध्ये डाउनलोड करण्याचा पर्याय

७. सर्व युपीआय लिंक केलेल्या बँक खात्यांतील एकूण बॅलेन्सचे एकत्रित दृश्य - वैयक्तिक बॅलेन्स जोडण्याची गरज नाही.

# सिडकोकडून २२ हजार घरांसाठी लॉटरी, सर्वसामान्यांचे घराचं स्वप्न पूर्ण होणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विमानतळ आणि वेगाने रस्तेमार्गाचे जाळे विणले जाणाऱ्या नवी मुंबईत सध्याच जागांचे भाव गगनाला भिडले आहेत. यामुळे नवी मुंबईत सर्वसामान्यांना घर विकत घेणे अवघड होऊन बसले आहे. साध्या वन बीएचके घरांची किंमत कोट्यवधींच्या घरात गेली आहे. त्यामुळे नवी मुंबईत चांगल्या परिसरात घर घेणे सामान्य नागरिकांच्या खिशाला परवडणारे नसते. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक सिडकोकडून उपलब्ध होणाऱ्या परवडणाऱ्या घरांकडे डोळे लावून बसलेले असतात. या पार्श्र्वभूमीवर सिडकोकडून लवकरच नव्या घरांसाठी सोडत काढली जाणार




आहे. जून महिन्याच्या अखेरीस सिडकोकडून नवी मुंबईतील तब्बल २२ हजार घरे विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात येतील.

जून महिनाअखेरीस विविध नोडमधील २२ हजार घरे विक्रीसाठी उपलब्ध करण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे. बुधवारी होणाऱ्या संचालक मंडळाच्या बैठकीत त्यावर शिक्कामोर्तब केला जाण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे मागील गृहयोजनेतील शिल्लक राहिलेल्या १६ हजार घरांचासुद्धा यात समावेश केला जाणार आहे. सिडकोने अलीकडेच काढलेल्या २६ हजार घरांच्या विक्री योजनेला विविध कारणांमुळे अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. असे असले तरी सोडतीत यशस्वी ठरलेल्या जवळपास दहा हजार ग्राहकांनी घराचा पहिला हप्ता भरला आहे. हा प्रतिसाद समाधानकारक असल्याचे सिडको प्रशासनाकडून सांगण्यात आले होते.

लवकरच सिडकोच्या घरांची सोडत प्रक्रिया सुरु होण्याची शक्यता आहे. जून महिन्याच्या अखेरीस सिडकोकडून घरांच्या लॉटरीसाठी अर्ज मागवण्याची प्रक्रिया सुरु होईल, असा अंदाज आहे. लॉटरीत जवळपास २२ हजार घरे विक्रीसाठी उपलब्ध करण्याचा सिडकोचा निर्णय. सिडकोच्या संचालक मंडळाची आज बैठक आहे. या बैठकीत सोडत प्रक्रिया कधी सुरु होणार, यावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. सिडकोच्या नव्या सोडतीमधील २२ हजार घरांमध्ये वाशीसह, जुईनगर, खारघर, तळोजा, द्रोणागिरी येथील घरांचा समावेश आहे.

मुंबईत म्हाडा प्राधिकरणाकडून दिवाळीपूर्वी ५००० घरांसाठी सोडत काढली जाण्याची शक्यता आहे. म्हाडाने पुढील वर्षभरात मुंबईसह राज्यात १९,४९७ घरं बांधणीचं उद्दिष्ट ठेवलं असून मुंबईत ५१९९ घरं बांधली जाणार आहेत. त्यामुळे दिवाळीपूर्वी ५००० घरांची सोडत निघाल्यास तो सर्वसामान्यांसाठी मोठा दिलासा ठरेल.

## विविध वृत्त...

### शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी संभाजी ब्रिगेडचे कृषी कार्यालयासमोर रक्तदान आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** निवडणूक काळात शेतकरी कर्जमाफी व सातबारा कोरा करण्याचे दिलेले आश्वासन पूर्ण करण्यात यावे. तत्कालीन कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी बुलढाणा जिल्ह्यातील येलो मोज्यामुळे रिजेक्ट केलेले सर्व शेतकऱ्यांचे पिक विमा तात्काळ जमा करण्यात यावे. एक रुपयात पिक विमा योजना बंद हा निर्णय मागे घेण्यात यावा. शेतकऱ्यांचे अनेक दिवसांचे रखडलेले फळबाग, तुषार ,ठिबक, विहीर व गोट्याचे अनुदान तात्काळ जमा करण्यात यावे. यासह अन्य मागण्यासाठी आज संभाजी ब्रिगेडच्या वतीने बुलढाणा जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयासमोर रक्तदान आंदोलन करत सरकारचे लक्ष वेधले आहे.

### जिल्ह्यात 10 जुलैपर्यंत विविध उपक्रम ; राज्यमंत्री पंकज भोयर यांची पत्रकार परिषदेत माहिती



दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी :** विकसित भारताचा अमृत काळ सेवा सुशासन गरीब कल्याण चे ११ वर्ष पूर्ण झाल्याबाबत वर्गात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. ९ जून ते १० जुलै पर्यंत विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत. विकसित भारत आत्मनिर्भर भारत आणि संकल्प से सिद्धी या मंत्राने कार्यकाल ओळखला जाईल, – जिल्ह्यात विविध कार्यक्रम राबवण्यात येणार आहेत. अशी माहिती पालकमंत्री पंकज भोयर यांच्यासह जिल्हाध्यक्ष संजय गांते यांनी पत्रकार परिषदेत दिली.

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा खामगाव (जि.बुलढाणा) दौरा

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे गुरुवार, दिनांक १२ जून २०२५ रोजी खामगाव जि. बुलडाणा दौऱ्यावर येत आहे.



त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे : गुरुवार दिनांक १२ जून रोजी दुपारी ४.४५ वाजता अकोला येथून शासकीय विश्रामगृह, खामगाव येथे आगमन व नागरिक, कार्यकत्यांच्या भेटीसाठी राखीव. सायंकाळी ६ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर परिषद मैदान, खामगाव जि.बुलढाणा येथे आगमन व कार्यकर्ता मेळावास उपस्थिती. रात्री ८ वाजता देवजी खिमजी मंगल कार्यालय, खामगाव जि. बुलढाणा येथे आगमन व पत्रकार परिषदसाठी उपस्थिती. रात्री ८.४५ वाजता राखीव. त्यानंतर सोईनुसार शेगाव जि. बुलढाणाकडे प्रयाण व मुक्काम.

### वाळू मिळविण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करा

**बुलढाणा/प्रतिनिधी :** नागरिकांना स्वस्त दराने वाळू उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने रेतीचे उत्खनन, साठवणूक व ऑनलाईन प्रणालीद्वारे विक्री करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सिंदखेड राजा तालुक्यातील मौजे हिवरखेड पुर्णा घाटासाठी टाकरखेड वायाळ येथील गट क्रमांक २७५ मध्ये वाळू डेपोमधून नागरिकांना वाळू विक्रीची ऑनलाईन प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. या संधीचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा खनिकर्म अधिकारी अजितराव जंगम यांनी केले आहे.

मंजुर निविदेनुसार प्रतिब्रास वाळूचा दर निश्चित करण्यात आला असून निविदेनुसार मंजूर दर ५५३.५०+ स्वामीत्वधन ६०० रुपये+डिएमएफ १० टक्के १६.५२ असे १ हजार २३० रुपये दर निश्चित करण्यात आले आहे. वाहतुक खर्च हा ग्राहकाकडे राहिल. नागरिकांनी वाळू नोंदणीकरीता ऑनलाईन पद्धतीने ://... या संकेतस्थळावर सेतू सुविधा केंद्र किंवा ई महासेवा केंद्रातून महाखनिज प्रणालीवर वाळूची ऑनलाईन मागणी नोंदवावे. दि. ९ जून २०२५ चे सायंकाळी ६ वाजेपर्यंत वाळू डेपोमध्ये जमा झालेल वाळू साठा ग्राहकांच्या नोंदणीसाठी दि. १२ जून २०२५ रोजी दुपारी १२ वाजेपासून सुरु करण्यात येत आहे. वाळूची मागणी नोंदविल्यानंतर ग्राहकांने १५ दिवसाच्या आत वाळू घेऊन जाणे बंधनकारक आहे.

# आंदोलन मोडण्याचा सरकारने प्रयत्न केल्यास मंत्र्यांना गाव बंदी करू

## बच्चू कडू यांच्या भेटीनंतर शेतकरी नेते रविकांत तुपकर यांचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** बच्चू कडू यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे.सरकारने बच्चू कडू यांच्यासोबत चर्चा करावी, आंदोलन मोडण्याचा सरकारने जर प्रयत्न केला सरकारमधील मंत्र्यांना तशाच तसं उत्तर देऊ, आंदोलन करताना तुरुंगात टाकल जातं आहे. आता तुमचे मंत्री गावात आले तर त्यांना गावबंदी करू हे लक्षात ठेवावे, असा इशारा शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी






बच्चू कडू यांच्या भेटीनंतर शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी मांध्यमांशी प्रतिक्रिया देताना दिला आहे.

यावेळी ते म्हणाले की, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवायची असेल तर सरकारने बच्चू कडूच्या मागण्या मंजूर कराव्या , अन्यथा परिणाम भोगायला तयार राहावे, लोकशाहीमध्ये आंदोलन करण्याचा अधिकार आहे.दिव्यांग शांततेच्या मार्गाने आंदोलन करीत होते. मंत्रालयामध्ये मात्र त्यावर दडपशाही गेली. मंत्रालयात जाण्यासाठी कोणाला परवानगीची गरज नाही. असे मत माध्यमांशी बोलताना शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी व्यक्त केले.

## ...तर मी सरकार विरोधात रस्त्यावर उतरेल; मनोज जरांगे पाटील यांचा उपोषण स्थळावरून इशारा

दैनिक आपला विदर्भ



**अमरावती/प्रतिनिधी :** उपोषण कर्ता हा केवळ कार्यकर्त्यांचे मनोबल खचू नये म्हणून चेहऱ्यावर दाखवता नाही. माणूस जर आपल्यासाठी उपोषणाला बसला तर, कर्ज माफीसाठी बच्चू कडू आंदोलनाला बसले तर शेतकऱ्यांनी राज्यात उठाव करावा. सरकारने मागणी मान्य नाही केली, तर राज्यातील शेतकऱ्यांनी रस्त्यावर उतरावे. मी देखील उपोषणाला बसायला तयार आहे. आपला माणूस आपल्यासाठी जीवाची बाजी लावत असेल, तर राज्यातील सर्व रस्ते जाम करून टाकावे. राज्यातील शेतकऱ्यांच्या जेवढ्या संघटना असेल, त्यांनी आता बच्चू कडू यांच्या पाठीशी राहावे. असे आवाहन करीत बच्चू कडू यांच्या जीविताला काही झाल्यास, मी मुख्यमंत्री विरोधात रस्त्यावर उतरेल. असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांना दिला आहे. यावेळी ते म्हणाले की, शेतकरी संघटनांनी एक दिवस ठरवून राज्य भर आंदोलन करावे.बच्चू कडू मला भेटायला आले होते, माझा बच्चू कडू यांच्यावर खूप जीव आहे.बच्चू कडू यांनी अंत यात्रेचा शब्द काढला, म्हणून मी इथे निघून आलो.शेतकरी रस्त्यांवर नाही आले, तर न्याय कसा मिळेल. सगळ्या क्षेत्रातील लोकांनी या आंदोलनात उतरावे. सर्व शेतकरी संघटना अध्यक्षांनी एकत्र लवकर बसावे. तातडीची बैठक बोलावून बेमुदत राज्य भर बंद करावे, बच्चू कडू यांच्या आंदोलनात मी शेतकऱ्यांचे पोरग म्हणून कायम सोबत आहे. राज्यात सगळ्या जास्त वाईट परिस्थिती शेतकऱ्यांची आहे. बच्चू कडू यांच्या जीविताला काही झाल्यास, मी मुख्यमंत्री विरोधात रस्त्यावर उतरेल. असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांना दिला आहे.

## बाल कामगार प्रथा विरोधी जनजागृती अभियान; विविध कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जागतिक बालकामगार विरोधी दिन दि. १२ जुन रोजी संपूर्ण जगात पाळला जातो. हा दिवस २००२ पासून पाळण्यात येत असून या दिनाचे औचित्य साधून सरकारी कामगार अधिकारी म.तु. जाधव यांच्याद्वारे बाल कामगार प्रथा विरोधी जनजागृती अभियान व सप्ताह जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे.

या अनुषंगाने जिल्ह्यामध्ये विविध व्यापारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकांचे आयोजन करुन त्यामध्ये जिल्ह्यातील दुकाने, हॉटेल, व्यापारी संस्था व इतर सर्व आस्थापनांच्या व्यापारी बंधुना बालकामगार या अनिष्ट प्रथेविरुध्द माहिती देवून तसेच त्यांना बाल मजुरी निर्मुलनाचे महत्व समजावुन सांगण्यात येवुन जनजागृती करण्यात येणार आहे.

आमच्याकडे बालकामगार काम करीत नाहीत व यापुढेही बालकामगार ठेवणार नाही, असे हमीपत्र व्यापारी वर्गाकडून भरुन घेण्यात



येईल. कोणत्याही आस्थापनेने १८ वर्षाखालील बालक किंवा किशोरवयीन बालकास आपल्या आस्थापनेवर कामास ठेवू नये, ठेवल्यास सदर आस्थापनेवर कायदेशिर कारवाई करण्यात येईल. लहान वयात काम केल्यामुळे बालकांच्या त्वचा, श्वसनमार्ग संस्था, मेंदु, जठर संस्था यावर विपरीत परीणाम होतो. त्यांची मानसिक, शारीरीक व बौध्दीक वाढ खुंटते. चांगले जीवन जगण्याचा त्यांना अधिकार आहे, तो आपण सर्वांच्या प्रयत्नाने व मदतीने त्यांना मिळाला पाहीजे. या निमित्ताने बालमजुरी मुक्त महाराष्ट्र या मोहिमेमध्ये सुध्दा जागरुक नागरीक म्हणुन सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी म.तु. जाधव यांनी केले आहे.

## डोणगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** येथे महसूल विभागांतर्गत मेहकर उपविभागीय अधिकारी रविंद्र जोगी, तहसीलदार निलेश मडके यांच्या प्रमुख मार्गदर्शनात डोणगाव येथील ग्राम महसूल अधिकारी कार्यालयासमोर ११ जून रोजी सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभाग व इतर शासकीय विभागा संबंधीत दैनंदिन प्रश्नांचे निराकरण व्हावे, जनतेच्या तक्रारी निकाली निघाव्या,तसेच महसूल प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान व्हावे, यासाठी मंडळस्तरावर समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरात विविध विभागाच्या वतीने लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवासी नायब तहसीलदार सुरेन्द्र कावळे होते. तर, प्रमुख पाहुणे म्हणून माजी पंचायत समिती सभा पती निंबाजी पांडव, नाझीम भाई कुरेशी,उत्तम परमाळे, ग्रामपंचायत सदस्य भगवानराव बाजड, ग्रामपंचायत सदस्य जुबेर भाई, ज्योती ताई बुरखंडे यांची उपस्थिती होती. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृषी विभागाचे तंत्र अधिकारी विजय सरोदे, वरिष्ठ शास्त्रज्ञ अमोल झापे यांनी संत्रा उत्पादक शेतकरी आणि इतर पिकांची पेरणी करताना घ्यावयाची काळजी या विषयावर मार्गदर्शन केले.

शिबिरात पंचायत समितीचे विस्तार अधिकारी संदीप मेटांगळे,कृषी विभागाचे मंडळ अधिकारी विजय राजूरकर, महसूल मंडळ अधिकारी रामराव चनखोरे,ग्राम विकास अधिकारी दीपक तांबारे,डोणगाव प्राथमिक आरोग्य विभागाचे शिवशंकर बळी, विधी व न्याय सहाय्यता विभागाचे अवसरमोल, संतोष तोंडे,शाखाव्यवस्थापकराजेंद्रकोळी,लेकुरवाळे, पवार यांच्यासह विविध विभागा



तील अधिकारी व कर्मचायांची उपस्थिती होती. यामध्ये ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांना रहिवाशी, उत्पन्न व जातीचे दाखले, रेशन कार्ड यांचे वाटप, संजय गांधी निराधार योजना, आधार नोंदणी, पीएम किसान योजना आदी सामाजिक लाभाच्या योजना इत्यादींचा लाभ देण्यात आला.

तसेच या अभियानांतर्गत सात–बारा वाटप, प्रलंबित फेरफार नोंदी निर्गमीत करणे पिककर्ज नुतनीकरण, प्रधानमंत्री जीवन सुरक्षा विमा योजना व विविध शासकीय योजनासाठी लागणारे दाखले अशा महसूल विभागाच्या विविध योजनाची माहिती या शिबिराच्या माध्यमातून देण्यात आली. तसेच पुरवठा विभाग, संजय गांधी योजना, सेतू विभाग, आरोग्य विभाग, विधी सहाय्यता विभाग,कृषी विभाग, घरकुल मंजुरी प्रमाणपत्रे, महावितरण विभागातर्फे सोलार जोडणी, आधार नोंदणींचा थेट लाभ लाभार्थ्यांना देण्यात आला.

कार्यक्रमाचे संचालन हामीद मुल्लाजी यांनी केले. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक संदिप परमाळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तलाठी अमोल राठोड, अनुप नरोटे,भूषण खिल्लारी, गुंठेवार,चव्हाण, सेतू चालक गजानन बोंद्रे, रमेश वाघटकर, अमोल ठाकरे, राजु वाठोरे, कोतवाल मानवतकर, दोडके, राक्षे, शेळके यांनी परिश्रम घेतले.

# बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनास आमदार झनक यांचा पाठिंबा; शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांचे केले समर्थन

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** विविध मागण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष माजी मंत्री बच्चू कडू यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. सदर आंदोलनास रिसोड विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमित जनक यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी दिव्यांग व विधवा महिलांना ६ हजार रुपये मानधन देण्यात यावे, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्ज माफी देण्यात यावी, शेतमालाला हमीभावावर २० टक्के अनुदान देण्यात यावे,युवकांच्या हाताला काम द्यावे नाहीतर सन्मानजनक दाम देण्यात यावा,. तसेच रिक्त जागा तातडीने भरण्यात याव्यात व जास्त पद्संख्याच्या जाहिराती प्रसिद्ध करण्यात याव्या,शहराप्रमाणे ग्रामीण भागातील घरकुलाकरिता समान निकष लावून किमान ५. लाख रुपये अनुदान लाभार्थ्यांना देण्यात यावे, शेतकऱ्याप्रमाणे शेतमजुरांना अपघाती मृत्यु झाल्यास आर्थिक सहाय्य देण्यात यावे, तसेच शेतमजुराकरिता स्वतंत्र मंडळ स्थापन करण्यात यावे,फळपिकांना ३.५ रेषो लाऊन दुग्ध व्यवसाय सुद्धा चडझला जोडण्यात यावे, हे जर होत नसेल तर तेलंगणाच्या धर्तीवर



एकरी १० हजार रुपये मदत किंवा भावाचा चढउतार निधी देण्यात यावा. ज्याप्रमाणे रासायनिक खताला अनुदान देण्यात येते त्याच प्रमाणे शेणखताला अनुदान देण्यात यावे.

मेंढपाळ व मच्छीमार यांच्यासाठी स्वतंत्र धोरण तयार करून त्यांचे प्रश्न मार्गी लावावे, निवाशी अतिक्रमण नियमाकुल करण्यात यावे, दुधातील भेसळ रोखण्यात यावी तसेच गार्यीना दुधासाठी बेस रेट ५० रुपये प्रति लिटर व म्हसीच्या दुधासाठी बेस रेट ६० रुपये प्रति लिटर मिळावा, कांद्याचे दर स्थिर राहावेत यासाठी किमान ४० रुपये बाजार भाव होई पर्यंत निर्यात बंदीचा निर्णय करू नये,सन २०२५–२६ या वर्षासाठी ऊस पिकाला प्रति टन ४३०० रुपये दर १ टक्का रिकव्हरी बेस रेट धुरन मिळावा तसेच पुढील ११ टक्के रिकव्हरी साठी ४३० रुपये एमआरपी दर मिळावेत



तसेच प्रत्येक शेतकऱ्याला काटा करून रिकव्हरी काढण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात यावी. व १५ दिवसामध्ये पैसे नाही दिले तर व्याजासह पैसे वसुल करण्याचे अधिकार स्थानिक यंत्रणेला देण्यात यावे, आदी मागण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनास रिसोड विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमित झनक यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे.